Maharashtra State
Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - 416 004

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 408
दिनांक:- 18 NOV 2025

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा/ सांगली / कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) फेब्रु.- मार्च 2026 विद्यार्थ्यांची अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदन पत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत.**

संदर्भ:- 1.शासनाचे पत्र क्र.एसएससी- 2002(66/02)/उमाशि-2, दिनांक 23 एप्रिल,2003
2.शासनाचे पत्र क्र.एसएससी-2011(185/11)/उमाशि-2, दिनांक 11 फेब्रवारी,2013
3.क्र.रा.मं./परीक्षा-8/3949 दिनांक 17.11.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.17.11.2025 रोजी संपुष्टात येत आहे.

आवेदनपत्रे सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर 1) श्रेणी / तोंडी / प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी 30 दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु. 50/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, 2) अतिविलंब शुल्काच्या निर्धारीत तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या 15 दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रति दिन रु. 100/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या 15 दिवसांकरिता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसांपर्यंत म्हणजेच दि.19.02.2026 पर्यंत प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.200/- प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

लेखी परीक्षा दि.20.02.2026 रोजी सुरु झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणा-या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. 50/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. 100/- प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. 200/-प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) | मंगळवार दि.18.11.2025 ते शुक्रवार दि. 02.01.2026 | शनिवार दि.03.01.2026 ते शनिवार दि.17.01.2026 | रविवार दि.18.01.2026 ते गुरुवार दि.19.02.2026 |

1. सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र Online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्क Online पध्दतीने चलन तयार करुन चलनावर नमूद ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेद्वारे त्याच दिवशी Online जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राह्य धरण्यात येतील. शाळेने चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास विलंबाचे यथायोग्य शुल्क आकारण्यात येईल.
2. Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असे नमूद विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र, प्रिलिस्ट व चलन सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहित प्रपत्र पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार व तुरळक (Isoleted) विद्यार्थ्यांच्या इ.10 वी च्या मागील परीक्षांचे गुणपत्रिकांच्या छायाप्रतीसह मंडळ कार्यालयात जमा करावेत.
3. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल, तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेऊन सदर हमीपत्र परिशिष्ट 'अ' सोबतच मंडळ कार्यालयात जमा करावेत.
4. **त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव / जन्मतारीख / विषय / माध्यम याबाबत Prelist च्या दुरुस्त्या राहिलेल्या असल्यास Online पध्दतीने 05 डिसेंबर पर्यंत पूर्ण कराव्यात.**

**कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

18.11.25

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर**

सोबत - परिशिष्ट अ

ACK

# परिशिष्ट–अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नाव: ----------------------------------

विभागीय मंडळाचे नाव: ------------ विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांक: ----------------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ----------------------------------------------------------------

२) शाळेचे नाव व पत्ता : ------------------------------------------------------------

३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : -------------------------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. -------------------------- २. --------------------------

३. -------------------------- ४. --------------------------

५. ------------------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : --------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम -----------

क) दंड कशाप्रकारे भरला – रोख/धनाकर्ष (डी.डी.)/चलन क्रमांक -------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------------------------------------

----------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का